# उल्लास

## प्रवेशिका (भाग - 4)




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

राज्य साक्षरता केंद्र


## उल्लास प्रवेशिका (भाग - 4)


- **प्रेरणा :**
  **मा. ना. दिपक केसरकर**
  मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. रनजीत सिंह देओल**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. सूरज मांढरे**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र, पुणे.
- **मार्गदर्शन :**
  **श्री. अमोल येडगे** (भा.प्र.से.),
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. महेश पालकर**
  संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्रीम. उषा शर्मा,** प्रोफेसर एवं प्रभारी,
  राष्ट्रीय साक्षरता केंद्र– कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **श्री. रमाकांत काठमोरे,** सहसंचालक,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती व संपादन :**
  **डॉ. नेहा बेलसरे,** उपसंचालक, राज्य साक्षरता केंद्र,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. रत्नमाला खडके,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला (महाराष्ट्र).
  **डॉ. मंजुषा क्षीरसागर,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे (महाराष्ट्र).
- **निर्मिती, संपादन व सल्लागार – हिंदी उल्लास (CNCL) :**
  **श्रीम. बाणी बोरा,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **याचना गुप्ता,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **शिवा श्रीवास्तव,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **रोहित नैनवाल,** सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **सोनाली,** कनिष्ठ प्रकल्प सहायक, राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
- **समन्वयक :**
  **डॉ. गितांजली बोरुडे,** विभाग प्रमुख,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. सचिन चव्हाण,** विभाग प्रमुख,
  सामाजिकशास्त्र विभाग , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. पंढरीनाथ जाधव,** अधिव्याख्याता,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. अण्णासाहेब कुटे,** विषय सहायक,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तांत्रिक साहाय्य व डिझायनिंग :**
  **श्री. स्वप्निल वैरागडे,** शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा महाबळा, ता. सेलू, जि. वर्धा.
- **मुखपृष्ठ रेखाटन :**
  **श्री. सुभाष जीवा राठोड,** कलाशिक्षक, दीपचंद चौधरी विद्यालय, सेलू, जि. वर्धा.
- **प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर, 2023
- **अर्थसाहाय्य :** राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **मुद्रक :** रुना ग्राफिक्स, पुणे


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# उल्लास

## प्रवेशिका (भाग - 4)




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
राज्य साक्षरता केंद्र

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 11. | मनोरंजन | 257 |
| 12. | वित्तीय साक्षरता | 275 |
| 13. | डिजिटल साक्षरता | 295 |


# मनोरंजन



## बोलण्यासाठी

दैनंदिन जीवनात आपण सर्व जण मनोरंजनासाठी निरनिराळ्या साधनांचा वापर करतो जसे की; गाणे गातो, कथा ऐकतो, चित्रपट पाहतो, नाटक पाहतो. या चित्रात कोणकोणती मनोरंजनाची साधने दर्शविली आहेत, याविषयी सहभागींशी चर्चा करा. तसेच दैनंदिन जीवनात ते कोणकोणत्या मनोरंजनाच्या साधनांचा वापर करतात. यावर चर्चा करायला सांगा. चित्रात दिसणाऱ्या मनोरंजनाच्या साधनांना वर्तुळ करा.





# 11. मनोरंजन

**आपण शिकूया!**

- आकारांची ओळख करून देणे (चौरस, आयत, त्रिकोण, वर्तुळ इ.)
- आकारांचे आकृतिबंध (पॅटर्न) आणि संख्यांचे आकृतिबंध (पॅटर्न) समजून घेणे.

## मोफतच मोफत

एके दिवशी गणपतरावांना ओले खोबरे खावेसे वाटले, परंतु घरात एकही नारळ नव्हता. ''अरे बापरे! आता मला बाजारात जावे लागेल.'' त्याने पत्नी लीलाबाईंना सांगितले. लीलाबाई म्हणाल्या, ''खायचे असेल तर बाजारात जावेच लागेल.''गणपतराव म्हणाले, ''त्यासाठी पैसे खर्च करावे लागतील.''

लीलाबाई म्हणाल्या, ''हो, पैसे तर खर्च करावे लागतीलच.''



गणपतराव जरा कंजूष होते, पण त्यांना खोबरं खाण्याचा मोह झालेला होता. ते लीलाबाईंना म्हणाले, ''बरं, मी येतो बाजारात जाऊन.''

गणपतराव बाजारात निघाले. बाजारात लोक आपापल्या कामात व्यस्त होते. गणपतराव इकडे तिकडे बघत नारळाच्या दुकानात पोहोचले. ''ओ दुकानदार, नारळ किती रुपयाला दिला?'' गणपतरावांनी विचारले.

दुकानदार म्हणाला, ''फक्त दोन रुपयात काका.''



गणपतराव डोळे मोठे करून म्हणाले, ''दोन रुपये! किंमत खूप जास्त आहे, एक रुपयाला द्या.''

दुकानदार म्हणाला, नाही हो नाही''

गणपतराव म्हणाले, ''मग सांग, एक रुपयाला नारळ कुठे मिळेल?''

दुकानदार म्हणाला, ''इथून थोड्या अंतरावर दुसरी बाजारपेठ आहे कदाचित तिथे मिळेल.''

गणपतराव बाजारपेठेच्या दिशेने निघाले.

बाजारपेठेत लोकांचे मोठमोठ्याने ओरडण्याचे आवाज येत होते. गणपतरावांनी कपाळावरचा घाम पुसला, इकडे तिकडे पाहिले. त्यांना एक नारळवाला दिसला. त्यांनी विचारले, ''अरे भाऊ, नारळ किती रुपयाला दिला?''



''फक्त एक रुपयाला, काका,'' नारळ विकणाऱ्याने उत्तर दिले. त्यावर गणपतराव म्हणाले, ''मी खूप दूरवरून आलो आहे. पन्नास पैसे पुरेसे आहेत.'' नारळ विकणाऱ्याने स्पष्ट नकार दिला आणि म्हणाला, ''समुद्र किनारी जा, कदाचित तुम्हांला तिथे पन्नास पैशांमध्ये मिळेल.''

पाय फरफटत गणपतराव तेथून चालायला लागले व समुद्रकिनारी पोहोचले. समुद्राच्या काठावर एक नावाडी बसला होता.



''अरे भाऊ, एक नारळ किती रुपयाला देशील?'' गणपतरावांनी विचारले. ''काका, फक्त पन्नास पैशामध्ये'' नावाडी म्हणाला. तेवढ्यात गणपतराव म्हणाले, ''मी एवढ्या लांब पायी चालत आलोय आणि तू सांगतोस पन्नास पैसे? मी तुला पंचवीस पैसे देईल.'' गणपतराव नारळ उचलण्यासाठी खाली वाकणारच होते, तेवढ्यात नावाडी ओरडला,

''नारळ खाली ठेवा.''

आणि तो गणपतरावांकडे बघत म्हणाला, ''स्वस्त हवा का? नारळाच्या बागेत जा.''

गणपतराव नारळाच्या बागेत पोहोचले. बागेत एक माळी होता. त्याला त्यांनी नारळाची किंमत विचारली. माळी म्हणाला, ''पंचवीस पैशाला एक.''

''पंचवीस पैसे? चालून चालून चप्पल झिजली, पाय थकले आणि आता पैसेही द्यावे लागतील? – नारळ फुकट दे,'' गणपतराव म्हणाले.
माळी म्हणाला, ''इथे झाडं आहेत आणि नारळही आहेत. तुम्हांला पाहिजे तेवढे तोडून घ्या.'' हे ऐकून गणपतरावांना खूप आनंद झाला व ते पटकन झाडावर चढले. सर्वांत मोठा नारळ तोडण्यासाठी त्यांनी दोन्ही हात पुढे केले. तेवढ्यात त्यांचा पाय घसरला. गणपतरावांनी दोन्ही हातांनी लगेच नारळ धरला, त्यांचे दोन्ही पाय हवेत लटकत होते, त्यांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केला. ''अरे भाऊ! मला मदत कर,''



त्यांनी खाली उभ्या असलेल्या माळ्याला विनंती केली. माळी म्हणाला, ''ते माझे काम नाही, काका. हा तुमचा आणि तुमच्या नारळाचा विषय आहे. ना पैसा, ना खरेदी, ना विक्री आणि ना मदत. सर्व काही मोफत!''

त्याचवेळी उंटावर स्वार झालेला एक माणूस तेथून जात होता. गणपतराव जोरजोरात हाक मारू लागले, ''ओ उंटवाले, मला झाडावरून उतरण्यासाठी मदत करा, फार उपकार होतील.'' उंटवाला उंटाच्या पाठीवर उभा राहिला आणि त्याने गणपतरावांचे पाय धरले, त्याच क्षणी उंटाला हिरवी–हिरवी पाने दिसली. पाने खाण्याच्या लोभापायी उंट जागेवरून सरकला. तेवढ्यात, तो माणूस उंटावरून घसरला. आपला जीव वाचवण्यासाठी त्याने गणपतरावांचे पाय घट्ट पकडले. आता दोघे काय करणार? एवढ्यात एक घोडेस्वार आला. घोडा पाहून गणपतराव ओरडले, ''भाऊ! मला मदत कर, सुरक्षित खाली उतरव.''





समोर असलेल्या हिरव्या गवताच्या आशेने घोडासुद्धा पुढे सरकला.

एक, दोन आणि आता तीन! तिघेही नारळाच्या झाडावरून लोंबकळायला लागले. घाबरून गेलेला घोडेस्वार गणपतरावांना म्हणाला, ''काका! काका! नारळ घट्ट धरून ठेवा, मी तुम्हांला शंभर रुपये देईन.''

लगेच उंटवाला म्हणाला, ''मी तुम्हांला दोनशे रुपये देतो.''

''तीनशे रुपये! इतके पैसे!'' गणपतरावांनी आनंदाने आपले दोन्ही हात पसरले... आणि त्यांच्या हातातून नारळ सुटले. धाडकन तिघेही जमिनीवर पडले – घोडेस्वार, उंटवाला आणि गणपतराव.

गणपतराव स्वतःला सावरतच होते, तेवढ्यात एक मोठा नारळ डोक्यावर पडला. अगदी मोफत!

– ममता पण्ड्या

अनुवाद – संध्या राव

(स्रोत – रिमझिम, इयत्ता – ४, एनसीईआरटी)

## संवादासाठी

प्रश्न 1. कथेत गणपतरावांना कंजूष म्हटले आहे. ते खरोखरच कंजूष होते का? जर होते, तर कसे ते स्पष्ट करा?

प्रश्न 2. तुम्ही गणपतरावांसारख्या इतर व्यक्तींना ओळखता का? ओळखत असल्यास त्यांच्याबद्दल माहिती सांगा.

प्रश्न 3. खालील वस्तू खरेदी करताना तुम्ही कोणकोणत्या गोष्टी लक्षात घेता आणि का?

(क) औषध (ख) कडधान्ये (ग) गहू (घ) हिरव्या भाज्या

## वाचा आणि सांगा.

कथेच्याआधारे, योग्य विधानावर होय (✓) आणि चुकीच्या विधानावर नाही (×) अशी खूण करा.

1. गणपतरावांना नारळ खायचे होते. होय ☐ नाही ☐
2. गणपतराव खूप कंजूष होते. होय ☐ नाही ☐
3. बाजारात नारळाचा भाव तीन रुपये होता. होय ☐ नाही ☐
4. माळ्याने गणपतरावांना मदत केली. होय ☐ नाही ☐
5. झाडावर 3 लोकं नारळाला लटकली होती. होय ☐ नाही ☐

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- काटकसरीने आणि हुशारीने पैसे खर्च करण्याबद्दल सहभागींशी चर्चा करा. दुकानात अनेकदा वस्तूंवर सूट मिळून सवलतीच्या दराने विक्री होते. या सवलतीने मिळालेल्या वस्तू वापरण्यायोग्य असतात का? याबद्दल सहभागींना आपले अनुभव कथन करण्यास सांगा.

## वाचा, सांगा आणि लिहा.

प्रश्न 1. नारळाच्या बागेपासून बाजारात येईपर्यंत नारळाची किंमत वाढते, असे का होत असेल?

______________________________

______________________________

______________________________

प्रश्न 2. कोणतीही वस्तू विकताना किंवा खरेदी करताना तुम्हांला कोणत्या समस्या येतात?

______________________________

______________________________

______________________________

प्रश्न 3. तुम्ही बाजारात कोणत्या वस्तू खरेदी करू शकता? तुम्ही खरेदी करू शकत नाही अशा कोणत्या वस्तू आहेत? कारण द्या.

| खरेदी करता येऊ शकणाऱ्या वस्तू | खरेदी न करता येऊ शकणाऱ्या वस्तू | कारण |
| --- | --- | --- |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**प्रश्न 4.** गणपतराव ज्याप्रमाणे आपला आनंद रोखू शकले नाहीत, त्याप्रमाणे आनंदाचे क्षण तुमच्या जीवनात कधी आले आहेत का, ते सांगा आणि लिहा.

______________________________

______________________________

______________________________

**प्रश्न 5.** रिकाम्या जागा पूर्ण करा.

(क) त्याच वेळी उंटावर ________ झालेला एक माणूस तेथून जात होता.

(ख) गणपतरावांचे दोन्ही ________ हवेत लटकत होते.

(ग) त्याच क्षणी उंटाला हिरवी ________ पाने दिसली.

(घ) तिघेही ________ जमिनीवर पडले.

**प्रश्न 6.** या कथेत संख्यांचा अक्षरी उल्लेख कोठे कोठे केला आहे? अंकांमध्ये लिहा. जसे –


| एक नारळ | = | 1 नारळ |
|---|---|---|
| पन्नास पैसे | = | 50 पैसे |
| ________ | = | ________ |
| ________ | = | ________ |
| ________ | = | ________ |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- महागाईबद्दल सहभागींशी चर्चा करा. अलीकडच्या काळात कोणत्या वस्तू महाग झाल्या आहेत? अशा कोणत्या गोष्टी आहेत, ज्या महाग झाल्या तरी तुम्हांला कोणताही फरक पडत नाही? तसेच किरकोळ, ठोक इत्यादी शब्दांच्या आकलनावर चर्चा करा.

## ताराने काढलेली चित्रे

ताराने काढलेली चित्रे ही सिनेमागृहाच्या भिंतींवर देखील लावलेली आहेत. ती त्रिकोण ( ), चौकोन आणि आयत ( आणि )आणि वर्तुळ ( ) या आकारांच्या मदतीने विविध प्रकारची चित्रे बनवते.




ताराने एकूण किती वर्तुळ, त्रिकोण आणि चौकोन यांच्या साहाय्याने हे चित्र बनवले आहे, हे सीमाला शोधायचे आहे. तुम्ही सीमाला मदत कराल का?



| | | |
|---|---|---|
| एकूण त्रिकोण | ( ) | |
| एकूण चौकोन | ( आणि ) | |
| एकूण वर्तुळे | ( ) | |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना त्यांच्या आजूबाजूला आणि दैनंदिन जीवनात दिसणारे आकार ओळखण्यास मदत करा.


- तुम्ही देखील त्रिकोण (  ), चौकोन (  /  ) आणि वर्तुळ (  ) यांच्या मदतीने काही चित्रे काढा.

- तुमच्या आजूबाजूच्या गोष्टी पाहा आणि लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्तुळ |  | सायकलचे चाक | | | |
| त्रिकोण |  | समोसा | | | |
| चौकोन |  | रुमाल | | | |
| आयत |  | दरवाजा | | | |

# रचना (डिझाइन) आणि आकृतिबंध

अनिताने जत्रेत विविध डिझाइन्सच्या पताकांपासून बनविलेल्या माळा बघितल्या. अनिता स्वतःसाठी काही पताका बनवत आहे. तुम्ही अनिताला पताका बनविण्यासाठी मदत करू शकता का?




अनिताने जत्रेतून काही चादरी विकत घेतल्या. या चादरींच्या कडेला तुम्हांला कोणते आकार दिसतात? त्यांची चित्रे काढा.





| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |


सरळ रेषेने बनणाऱ्या आकृत्या

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  | | | | |

वक्र रेषेने बनणाऱ्या आकृत्या

| | | | | |
|---|---|---|---|---|
|  | | | | |

काही रचनांमध्ये विशिष्ट आकार वारंवार का येतात? पताका बनविल्यानंतर अनिताने स्वत:ला बसण्यासाठी आसन बनवायला सुरुवात केली. तुम्ही अनिताचे आसन पूर्ण करू शकता का?



## ▪ किती कोन?

| ▲ | ▲▲ | ▲▲▲ | ▲▲▲▲ |
|---|---|---|---|
| 3 | 6 | 9 | |

## ▪ तुम्ही सांगू शकाल काय? खाली दिलेल्या रिकाम्या जागेत कोणता अंक येईल?

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 6 | 8 | | | |
| 3 | 6 | 9 | 12 | | | |
| 3 | 7 | 11 | 15 | | | |
| 10 | 20 | 30 | 40 | | | |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींशी चर्चा करा की, आकृत्या या सरळ रेषा किंवा वक्र रेषांपासून तयार होतात. तसेच पॅटर्नमध्ये ठरावीक आकारांची पुनरावृत्ती होते.

## ■ एकत्र शिकूया!

### वासुदेव (लोक कलाकार)

वासुदेव हा महाराष्ट्रातील गावांमधील सकाळच्या वेळी घरोघर हिंडून पांडुरंगावरील अभंग–गवळणी गात दान मागणारा लोक कलाकार आहे. मराठी संस्कृतीतील वासुदेवाची परंपरा सुमारे हजार–बाराशे वर्षे जुनी असावी, असा अंदाज आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या साहित्यात वासुदेवावरील रूपके आढळतात. डोक्यावरील मोरपिसांची टोपी, पायघोळ अंगरखा, पायात विजार किंवा धोतर, कमरेभोवती शेलावजा उपरणे गुंडाळलेले, एका हातात चिपळ्या दुसऱ्या हातात पितळी टाळ, कमरेला पावा, खंजिरी अशी वाद्ये आणि काखेला झोळी, गळ्यात कवड्यांच्या व रंगीबेरंगी मण्यांच्या माळा, हातात तांब्याचे कडे, कपाळावर व कंठावर गंधाचे टिळे असा वासुदेवाचा वेश असतो.

### वासुदेव आला! हो वासुदेव आला!

**दान पावलं, बाबा दान पावलं**
**वासुदेव आला, हो वासुदेव आला**
**सकाळच्या पारी, हरीनाम बोला ।।**



**नाही कुणी जागं, झोपलं पहारा**
**दु:खी जीव तुला, देवाचा सहारा**
**तुझ्यासाठी देव, वासुदेव झाला ।।**



**जागा हो माणसा, संधी ही अमोल**
**तुझ्या रे जीवाला, लाखाचं रे मोलं**
**घालतील वैरी, अचानक घाला ।।**



**इच्चेच्या झाडाला बांधलाय घोडा**
**घालुनिया घाव सारे बंध तोडा**
**नका रे उशीर, वेळ फार झाला ।।**

*कवी – मधूसुदन कालेलकर*

**नवीन शब्दांचे अर्थ :**

1. वासुदेव – सकाळी दान मागणारा लोक कलाकार, 2. पारी – वेळेस, 3. पहारा – नजर ठेवणे, 4. सहारा – आश्रय, 5. अमोल – ज्याची किंमत करता येत नाही असे, 6. मोल–किंमत, 7. वैरी – शत्रू, 8. घाला – आघात, 9. इच्चा – इच्छा, 10. बंध – बंधनं

## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- 'मनोरंजन' या विषयावर संभाषण करा. सहभागींना या विषयाशी संबंधित तीन ते चार शब्द लिहायला सांगा. हे शब्द त्यांच्या स्वतःच्या भाषेतीलही असू शकतात, जसे – सकाळसाठी 'सकार', पहाटसाठी पायटं इ. सहभागींसोबत मिळून गाणी, भजन, लोकगीते म्हणा.

## संवादासाठी

1. आपल्याकडे लोकगीते केव्हा गायली जातात?
2. तुम्हांला एखादे लोकगीत आठवते काय? आठवत असेल, तर ऐकवा.

# मनोरंजन

मनाला आनंद येणारी कोणतीही कृती रंजनाच्या सदराखाली येऊ शकते. मात्र त्यात सक्ती, निर्बंध वा अपरिहार्य कार्यपूर्ती असा कोणताही बाहेरून लादलेला भाग नसून ती केवळ ऐच्छिक असावी. हे अभिप्रेत असते. तीत व्यक्तीच्या स्वत:च्या आवडीनिवडीला संपूर्ण वाव असतो. मनोरंजनपर छंद वा कृती यांचा मूळ व प्रमुख उद्देश जरी मनाची निर्भेळ करमणूक हा असला तरी, त्या त्या विशिष्ट छंद वा क्रीडा प्रकारात नियोजनबद्ध परिश्रम करून व्यक्तीस खास कौशल्य संपादन करता येते. शिवाय स्वत:च्या आवडीच्या प्रकारात मन:पूर्वक काम करत राहिल्याने वेगळे परिश्रम असे जाणवत नाहीतच. रंजनाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासाच्या सर्वोच्च संधी अशा प्रकारे उपलब्ध होत असतात.


स्रोत – https://vishwakosh.marathi.gov.in/28407/

https://www.google.com/search-

https://maharashtratimes.com/astro/festival/news/shravan-mangala-gaur-2021





## टिपणी

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- मोफतच मोफत या गोष्टीतील नवीन शब्दांचे लेखन करून घ्या.
- विविध आकृतिबंध तयार करून घ्या.
- अध्ययनार्थींना माहिती असलेल्या गोष्टी सांगण्यासाठी प्रेरित करूया.

## टिपणी

# 12. वित्तीय साक्षरता

**आपण शिकूया!**

- बँक खाते उघडण्याशी संबंधित माहितीचा उपयोग करणे.
- बँकेशी संबंधित फॉर्म वाचणे, समजून घेणे आणि भरणे. (चेक, जमा पावती, पैसे काढण्याची पावती)

## माझे खाते माझा अभिमान

प्रगतीने पैशाचा गल्ला तोडला आणि अनेक नोटा आणि नाणी त्यातून खाली पडले. प्रगतीने ते मोजले, तर एकूण ₹ 2573 होते. हे पैसे तिने मोठ्या कष्टाने जमा केले होते. आता प्रश्न असा होता, की हे सांभाळायचे कसे? सल्ला घेण्यासाठी ती चेतनाकडे गेली. चेतना आणि प्रगती या दोघी जिवलग मैत्रिणी होत्या. चेतनाने सुचवले, की एकतर ते पैसे बँकेत जमा कर किंवा पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघड. हे ऐकून प्रगती भडकली आणि म्हणाली, ''मी बँकेच्या पंचवीस फेऱ्या केल्या, परंतु कोणीच लक्ष दिले नाही व व्यवस्थित माहिती ही सांगितली नाही.'' चेतना म्हणाली, ''आता तसं राहिलं नाही.'' त्यावरून दोघींमध्ये बरीच वादावादी झाली. अखेर प्रगतीने होकार दिला आणि दोन्ही मैत्रिणी बँकेत पोहोचल्या. तेथे एक बोर्ड लावलेला होता –

बोर्ड वाचून दोघीही हसल्या. तेथे त्यांना माहिती मिळाली, की जन–धन योजने–अंतर्गत खाते उघडले जाईल. सुरुवातीला कोणतीही रक्कम न भरता खाते उघडले

जाईल. यासोबतच कर्जाची सुविधा देखील मिळणार आहे, तसेच अपघात विमा काढला जाणार असून, सरकारकडून वेळोवेळी दिली जाणारी आर्थिक मदतही थेट बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

दोघीही आश्चर्यचकित झाल्या आणि त्यांना खूप आनंद झाला. त्यांना माहीत होते, की बँकेत पैसे सुरक्षित राहतात, तसेच व्याजदेखील मिळते, पण इतके सारे लाभ! व्वा! इतकी माहिती मिळाल्यावर आता चेतना आणि प्रगती दोघीही खाते का उघडणार नाहीत! बचत खाते उघडण्यासाठी दोघींनी फॉर्म भरले आणि जमा केले. प्रगतीने मतदार ओळखपत्र आणि आधारकार्डची प्रत दिली, ज्यामध्ये तिच्या राहण्याच्या ठिकाणाचा पूर्ण पत्ता लिहिला होता. चेतनाचे रुपे कार्ड हरवले होते. तिने सरपंचांकडून पत्र लिहून घेतले.

काही दिवसांनी पोस्टमनने डेबिट रुपे कार्ड (एटीएम) दिले. रुपे कार्डच्या साहाय्याने त्या कोणत्याही एटीएम मशीनमधून पैसे काढू शकत होत्या. रुपे कार्ड मिळाल्यानंतर दोघीही खूश होत्या. चेतना म्हणाली, ''आमचा तर रुबाब वाढला आहे. आता आम्हीपण खातेदार आहोत.''

'माझे खाते माझा अभिमान'

– निशात फारुक

- बँकेत खाते उघडा.
- सावकारापासून सुटका होईल.
- खाते उघडणे सोपे झाले. छोटासा फॉर्म भरा.
- सोबत कोणतेही ओळखपत्र पुरावे जोडा.
- जर खाते आधीच उघडले असेल, तर ते जन धन योजनेत रूपांतरित करता येऊ शकते.

## योग्य विधानांसह वाक्ये सरळ रेषेने जोडा.

| (अ) | | (ब) |
| --- | --- | --- |
| • बँकेत खाते | | • ओळखपत्राची प्रत जोडायची आहे. |
| • बँकेत पैसा | जसे | • रकमेविना उघडेल. |
| • सुरुवातीला खाते | | • दिले. |
| • पोस्टमनने रुपे कार्ड | | • उघडणे झाले सोपे. |
| • फॉर्मच्या सोबत | | • सुरक्षित राहतो. |

## वाचा, सांगा आणि लिहा.

प्रश्न 1. चेतनाने प्रगतीला पैसे जमा करण्यासाठी कोणता सल्ला दिला ?

प्रश्न 2. तुमचेही बँकेत बचत खाते आहे का ? तुमच्या बँकेचे नाव लिहा.

प्रश्न 3. बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये पैशांच्या व्यवहारात तुम्हांलाही एखाद्या समस्येला सामोरे जावे लागले आहे का ?

## रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1. खाते ____________ किंवा ____________ उघडायला पाहिजे.
2. आपल्या ____________ प्रमाणे खर्च केला पाहिजे.
3. जमा रकमेवर ____________ मिळते.
4. बँकेत खाते उघडण्यासाठी ________________, ______________ आणि ______________ याची आवश्यकता असते.

## खाली दिलेला फॉर्म भरा.

नाव ______________________________

वय ______________________________

लिंग ______________________________

पत्ता ______________________________


______________________________

______________________________

वार्षिक उत्पन्न ______________________________

मोबाईल नंबर ______________________________

## पाहा, वाचा आणि चर्चा करा.



जमा पर्ची / PAY-IN-SLIP    नकद/अंतरण/ CASH/TRANSFER

भारतीय स्टेट बैंक/ State Bank of India

शाखा/BRANCH

खाते का प्रकार : बचत बैंक/ चालू खाता/आवर्ती जमा/ कॅश क्रेडिट/सावधि ऋण

TYPE OF ACCOUNT SB ☐ /CA ☐ /RD ☐ /CC ☐ / TL

खाता संख्या / Account No.    दिनांक / DATE    /20

For the credit fo the Bank Account of

के बैंक खाते में जमा कराने हेतु

| नकद/चेकों के विवरण (पर्ची के दूसरी ओर) Details of Cash/cheque (overleaf) | ₹ | पै./P. |
|---|---|---|
| खाते में नकद जमा / Cash Deposit in the A/c | | |
| नकदी रखरखाव शुल्क / Cash Handling Charges | | |
| कुल जमा / Total Deposit | | |

रुपये (शब्दों में) / Rupees (in words)

कार्यालय उपयोग हेतु / For Office Use

एस. डब्ल्यू. ओ. / SWO    रोकड़ अधिकारी / पासकर्ता अधिकारी Cash Officer/ Passing Officer

जमा पर्ची / PAY-IN-SLIP    भारतीय स्टेट बैंक/ State Bank of India    नकद/अंतरण/ CASH/TRANSFER

शाखा / BRANCH    दिनांक/Date ........ /20 ........

नोट : कृपया नकद, चेक, ड्राफ्ट आदि जमा करने के लिए अलग-अलग पर्चीयां का उपयोग करें / Note : Please use separate slip for depositing cash, cheque, draft etc.

खाते का प्रकार : बचत बैंक/ चालू खाता/आवर्ती जमा/ कॅश क्रेडिट/सावधि ऋण

TYPE OF ACCOUNT : SB ☐ /CA ☐ /RD ☐ /CC ☐ / TL    खाता संख्या Account No.

के खाते में जमा करने हेतु / For the credit fo the Bank Account of

कुल जमा रुपये (शब्दों में) / Total Deposit (in words) ₹

| नोट: कृपया नकद/चेकों का विवरण पर्ची के पीछे की ओर लिखें Note : Please furnish details of cash/cheque overleaf | राशि/ Amount ₹ | पै./P. |
|---|---|---|
| खाते में नकद जमा / Cash Deposit in the A/c | | |
| 'पी' खण्ड के ग्राहकों को छोड़कर नगद रखरखाव शुल्क (कॅश/क्रेडिट/चालू खाता) Cash Handling Charges (CC/CA) other than 'P' Segment Customer | | |
| कुल जमा रुपये अंकों में / Total Deposit in figures ₹ | | |

शाखा / Branch

कोड नम्बर / Code No.

(if Deposit Is Made For Non Home Branch)
(यदि जमा राशि-मूल इतर (नॉन-होम) शाखा में जमा की जानी है)

मोबाईल/टेलीफोन नं. Mobile/ Phone No.    पैन नम्बर PAN No.


कार्यालय उपयोग हेतु / FOR OFFICE USE

एस. डब्ल्यू. ओ. / SWO    रोकड़ अधिकारी / पासकर्ता अधिकारी Cash Officer/ Passing Officer

जमाकर्ता के हस्ताक्षर / Signature of the depositor

CC No. 100999131

बँकेत पैसे भरावयाची स्लीप (पावती)



खाताधारक का (के) नाम / Name of the Account Holder(s)

भारतीय स्टेट बैंक STATE BANK OF INDIA    शाखा / BRANCH

बचत बैंक आहरण फार्म SAVINGS BANK WITHDRAWAL FORM

दिनांक Date

नोट : यह फार्म चेक नहीं है। इस फार्म के साथ पासबुक प्रस्तुत नहीं किए जाने पर भुगतान के लिए इनकार किया जाएगा। यह भुगतान केवल मूल (होम) शाखा में ही किया जाएगा।

NOTE : This form is not a Cheque. Payment will be refused if the pass book is not produced with this form. This payment will be made only at the Home Branch.

खाता संख्या ACCOUNT NUMBER

कृपया मुझे / हमें Please pay self/ourselves ₹........ (₹ ........ मात्र/ only)

का भुगतान करें और मेरे /हमारे उपर्युक्त बचत/बैंक खाते को यह राशि नामे करें I/ and debit the amount to my/our above savings bank account.

फोन/मोबाइल नं./Phone/Mobile No.

खाताधारक (कों) के हस्ताक्षर Signature(s) of the Account Holder(s)

कार्यालय उपयोग हेतु/FOR OFFICE USE

| पासकर्ता/Passed by | हस्ताक्षर/Signature | पासकर्ता/Passed by | हस्ताक्षर/Signature |
|---|---|---|---|
| एसडब्ल्यूओ/SWO | | पासकर्ता अधिकारी/PASSING OFFICER | |

CSD FBD 16/30.05.19/20,400 Pads(100)/Samira CC No. 100101080


बँकेतून पैसे काढावयाची स्लीप (पावती)




एटीएमकार्ड




बँक पासबुक




चेक (धनादेश)





20 रुपयांची नोट




एटीएम मशीन


- ***चेकचा वापर बँक खात्यातून पैसे काढण्यासाठी किंवा दुसऱ्याला पैसे देण्यासाठी केला जाऊ शकतो. चित्र पाहून चेक भरण्याचा सराव करा.***





- ***बँक खात्यात पैसे भरण्यासाठी, रक्कम जमा करण्याची एक पावती भरावी लागते. चित्र पाहून पैसे जमा करण्याची पावती (स्लीप) समजून घ्या.***



- ज्याप्रमाणे बँक खात्यात पैसे भरण्यासाठी पावती भरावी लागते, त्याचप्रमाणे बँक खात्यातून पैसे काढण्यासाठी पावती भरावी लागते. चित्र पाहून पावती समजून घ्या.





- रवीला ₹ 7300/- चा चेक रोहिणीला द्यायचा आहे. चेक भरण्यासाठी रवीला मदत करा.




- आकाशला बँकेत ₹ 1700/- भरायचे आहेत. आकाशला पैसे जमा करण्याची स्लीप (पावती) भरण्यास मदत करा.

### पैसे जमा करण्याची स्लीप (पावती)




- चेतनाला बँकेतून ₹ 2,700/- काढायचे आहेत. चेतनाला पैसे काढण्याची स्लीप (पावती) भरण्यास मदत करा.

### पैसे काढावयाची स्लीप (पावती)



## ■ प्रगतीच्या शेजारी राहणारी चेतना तिला विचारते, की बँकेत खाते उघडण्याचे कोणते फायदे आहेत?




**प्रगती – बँकेत खाते उघडण्याचे काही फायदे आहेत, जसे :**

- आपण आपली बचत सुरक्षितपणे ठेवू शकतो.
- जमा केलेल्या रकमेवर व्याज मिळते.
- गरज भासल्यास बँकेतून किंवा ए. टी. एम. मधून तुम्ही जमा रक्कम काढू शकता.
- तुम्ही इंटरनेटद्वारे पैशांचे व्यवहार करू शकता.
- तुम्ही इंटरनेटच्या माध्यमातून बिलं भरू शकता, ट्रेनची तिकिटे देखील काढू शकता.

प्रगतीच्या डायरीचा – बँकेचा हिशोब

| | |
|---|---|
| 15 फेब्रुवारी | जमा केले 2000 |
| 18 फेब्रुवारी | काढले 500 |
| | शिल्लक 1500 |
| 4 मार्च | जमा केले 1000 |
| | एकूण 2500 |
| 11 मार्च | काढले 600 |
| | शिल्लक 1900 |
| 17 मार्च | काढले 700 |

चेतना – तुम्ही किती पैसे जमा केले आणि किती काढले याचा हिशोब कसा ठेवता?

प्रगती – तसं तर मी डायरीत लिहिते; परंतु बँकपण आम्हांला पासबुक देते. ज्यामध्ये बँकेच्या व्यवहाराचा हिशोब नोंदविलेला असतो.

### प्रगतीचे पासबुक

| दिनांक | विवरण | जमा रक्कम | काढलेली रक्कम | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 15.02.2022 | रोख | 2,000 | | 2,000 |
| 18.02.2022 | रोख | | 500 | 1,500 |
| 04.03.2022 | रोख | 1,000 | | 2,500 |

**जर प्रगतीने 4 एप्रिलला खात्यात 2,500 रुपये जमा केले, तर बँक पासबुकमध्ये ती रक्कम कुठे नोंदवेल? आणि प्रगतीच्या खात्यात एकूण किती रक्कम जमा होईल?**

**शिक्षक सूचना :**

- बँक खाते सहज उघडता येते यावर चर्चा करा. यासाठी दोन छायाचित्रे आणि मतदान कार्ड, आधारकार्ड किंवा इतर कोणतेही ओळखपत्र आवश्यक आहे. पैसे नसताना जन–धन योजनेत खाते उघडता येते. रक्कम जमा करताना किंवा काढताना पासबुकामध्ये आपण टाकलेल्या रकमेची सद्य:स्थिती आणि उर्वरित रक्कम जाणून घेण्यासाठी अधिक प्रश्न विचारा आणि चर्चा करा.

## एटीएम कार्डविषयी संक्षिप्त माहिती

एटीएम कार्ड हे बँकेतून पैसे काढण्यासाठी तसेच पैसे जमा करण्यासाठी वापरले जाणारे इलेक्ट्रॉनिक कार्ड आहे; ज्याच्या साहाय्याने कुठेही, केव्हाही पैसे काढणे आणि बँक खात्याचा तपशील देखील जाणून घेणे शक्य आहे. पैशाच्या व्यवहाराशी संबंधित कोणतीही समस्या सोडविण्यासाठी, केवळ बँकेशी संपर्क साधावा. एटीएम कार्डद्वारा पैसे काढण्यासाठी एटीएम मशीन वापरले जाते.




## लक्षात ठेवा.

चेकची वैधता चिन्हांकित तारखेपासून 3 महिन्यांपर्यंत असते. क्रॉस चेक फक्त खातेधारकाच्या खात्यावर देय असतो.

## कधीही कोणाशीही शेअर करू नका.

1. ओटीपी
2. पिन
3. सीवीवी
4. खात्यासंबंधी माहिती
5. वैयक्तिक माहिती

## KYC म्हणजे काय?

KYC (Know Your Customer) ही अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे बँक एखाद्या व्यक्तीची ओळख आणि पत्ता यांची खात्री करते. आता आधारकार्डनेही KYC करता येते.

## KYC साठी आवश्यक कागदपत्रे

1. पॅन कार्ड
2. लाईट बिल
3. आधारकार्ड
4. घराचा पत्ता

## ▪ वाचा आणि लिहा.

**खाली आर्थिक साक्षरता आणि बँकेशी संबंधित काही महत्त्वाच्या गोष्टी दिलेल्या आहेत, त्या वाचा.**

### आर्थिक साक्षरता – म्हणजे काय?

- पैसे वाचविणे आणि खर्च करणे यांतील समतोल साधणे.
- बचतीसाठी जागरूक असणे.

### तुम्ही काय करू शकता?

- उत्पन्न, खर्च आणि बचतीचा हिशोब ठेवा.
- अनावश्यक खर्च टाळा.
- बचत करण्याची सवय लावा.
- बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये खाते उघडा.
- तुमची बचत योग्य ठिकाणी जमा करा.

### आर्थिक साक्षर होऊन काय फायदा होईल?

- भविष्यातील खर्च भागवण्यासाठीची पूर्वतयारी होईल.
- खर्चावर नियंत्रण येईल.
- हुशारीने खर्च करू शकाल.
- तुमच्या गरजा जाणून घ्याल.

### बँक खाते उघडण्याचे फायदे

- तुम्ही तुमची बचत, तुमच्या बँक खात्यात सुरक्षितपणे जमा करू शकता.
- जमा केलेल्या रकमेवर व्याज मिळते.
- गरज पडल्यास तुम्ही जमा रक्कम काढू शकता.

### बँक खाते उघडण्यासाठी खालीलपैकी कोणकोणत्या गोष्टी पाहिजेत. त्यापुढे (✓) अशी खूण करा.

- छायाचित्र ☐
- आधारकार्ड ☐
- पॅनकार्ड ☐
- मतदान ओळखपत्र ☐

### बँकेत खाते उघडल्यावर तुम्हाला बँकेकडून काय काय मिळेल?

- चेक बुक ☐
- पास बुक ☐
- डेबिट रुपे कार्ड (एटीएम कार्ड) ☐

## ▪ भीम ॲप (BHIM)


**भीम ॲप (BHIM) हे पैशांच्या व्यवहारांसाठी एक मोबाइल ॲप आहे. त्याला ई–पेमेंट असेही म्हणतात. यामध्ये तुम्ही तुमच्या मोबाईलद्वारे पैशांचे व्यवहार करू शकता.**

- दूरवर बसलेल्या व्यक्तीला पैसे पाठवू शकता.
- मुलांच्या शाळेची फी भरू शकता.
- तुम्ही वीज बिल भरू शकता.
- तुम्ही किराणा दुकानदाराला पैसे देऊ शकता.




- तुम्ही कर्ज फेडू शकता.

  सर्वप्रथम तुम्हांला तुमच्या मोबाईलमध्ये भीम ॲप (BHIM App) डाऊनलोड करून इन्स्टॉल करावे लागेल. यामध्ये तुम्ही हिंदीसोबतच 12 भारतीय भाषांमध्ये काम करू शकता. या ॲपमध्ये तुम्ही स्टेट बँक ऑफ इंडिया बरोबरच जवळपास 30 इतर भारतीय बँकांचा उपयोग करू शकता.




(स्रोत : - https:// https://www.npci.org.in/www.npci.org.in/
https://www.npci.org.in/product-overview/bhim-product-overview)

## वाचा आणि लिहा.

**बँक खाते उघडण्यासाठी खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.**

(आर्थिक साक्षरता म्हणजे उत्पन्न, खर्च यात पैशांचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करणे आणि बचतीप्रति जागरुक असणे.)

- फोटो (छायाचित्र)
- आधारकार्ड
- मतदान कार्ड
- पॅन कार्ड
- वीजबिल
- निवासी पत्ता

**डेबिट कार्डद्वारे आपण अनेक कामे करू शकतो. खाली काही कामांची यादी दिली आहे. आपण देखील काही कामांची नावे लिहा.**

- खरेदी
- किराणा
- ऑनलाइन खरेदी
- तिकीट बुकिंग
- हॉटेल बुकिंग
- ऑनलाइन पेमेंट
- शाळेची फी भरू शकतो
- पैसे ट्रान्सफर करू शकतो
- ____________________
- ____________________
- ____________________

■ **याशिवाय डेबिट कार्डने तुम्ही काय करू शकता? सांगा आणि लिहा.**

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- 'आर्थिक साक्षरता' या विषयावर चर्चा करा, सहभागींना या विषयाशी संबंधित तीन किंवा चार शब्द लिहायला सांगा, हे शब्द स्वतःच्या भाषेतीलही असू शकतात, जसे की 'रुपया'साठी 'रुपय्या' इ.

## ▪ मिळुन वाचा.

### दानाचा हिशोब



एक राजा होता. तो खूप स्वार्थी होता. स्वतःच्या सुखासाठी तो हजारो रुपये खर्च करीत होता; परंतु प्रजेसाठी खर्च करण्याची वेळ यायची त्यावेळी मात्र तो खर्च करायला मागे पुढे पाहत असे.

एक वेळ अशी आली, की सर्व राज्यामध्ये दुष्काळ पडला. राज्यातील सर्व प्रजा राजाकडे मदतीसाठी गेली. 'महाराज, धान्य खरेदीसाठी थोडे पैसे द्या' अशी विनंती केली, परंतु राजाने पैसे द्यायला साफ नकार दिला. राजा म्हणाला, ''आज तुम्ही दुष्काळाने त्रस्त आहात. उद्या भूकंप येईल. असेच जर मी प्रत्येकाची मदत करीत राहिलो, तर संपूर्ण राजभांडार रिकामे होईल आणि माझ्याजवळ काहीच पैसे शिल्लक राहणार नाहीत. मी काही देणार नाही.'' हे ऐकून सर्व लोक नाराज होऊन परत गेले.



जसजसे दिवस लोटत होते, तसतसा दुष्काळ आणखी तीव्र होत गेला. हजारो लोक अन्नावाचून मरू लागले. लोक वारंवार राजाला मदतीची याचना करत होते, परंतु राजाला त्याचा काहीच फरक पडला नाही.



काही दिवसांनंतर एक संन्यासी राजाच्या दरबारामध्ये आला. तो संन्यासी म्हणाला, ''महाराज खूप दूरून आलो आहे, मी तुमचे खूप नाव ऐकले आहे, तुम्ही माझी इच्छा पूर्ण करा.''

स्तुती ऐकून राजाला खूप आनंद झाला आणि तो म्हणाला बोला, ''तुम्हांला काय पाहिजे?'' संन्यासी म्हणाला, ''मी वीस दिवस दररोज एक खूप छोटेसे दान घेऊ इच्छितो; परंतु माझा दान घेण्याचा एक नियम आहे; पहिल्या दिवशी जे घेतो, त्याच्या दुसऱ्या दिवशी दुप्पट, तिसऱ्या दिवशी दुसऱ्या दिवशीच्या दुप्पट, चौथ्या दिवशी तिसऱ्या दिवसाच्या दुप्पट. अशा पद्धतीने रोज मी पटीत दान घेतो.



राजा म्हणाला, ''तुम्ही पहिल्या दिवशी किती आणि काय दान घ्याल?'' संन्यासी म्हणाला, ''फक्त एक रुपया.'' राजा खुश झाला. राजाने आदेश दिला. संन्यासी महाशयांच्या इच्छेनुसार राजभांडारांमधून त्यांना दान देण्यात यावे.

15 दिवस संन्याशाला भिक्षा दिल्यानंतर भांडारपाल चकित होऊन गेला. दान देत देत खूप संपत्ती दिली जात होती. त्याने हिशोब केला, तर 20 दिवसांमध्ये

## दानाचा हिशोब

| | | |
|---|---|---|
| पहिला दिवस | 1 | रुपया |
| दुसरा दिवस | 2 | रुपये |
| तिसरा दिवस | 4 | रुपये |
| चौथा दिवस | 8 | रुपये |
| पाचवा दिवस | 16 | रुपये |
| सहावा दिवस | 32 | रुपये |
| सातवा दिवस | 64 | रुपये |
| आठवा दिवस | 128 | रुपये |
| नववा दिवस | 256 | रुपये |
| दहावा दिवस | 512 | रुपये |
| अकरावा दिवस | 1,024 | रुपये |
| बारावा दिवस | 2,048 | रुपये |
| तेरावा दिवस | 4,096 | रुपये |
| चौदावा दिवस | 8,192 | रुपये |
| पंधरावा दिवस | 16,384 | रुपये |
| सोळावा दिवस | 32,768 | रुपये |
| सतरावा दिवस | 65,536 | रुपये |
| अठरावा दिवस | 1,31,072 | रुपये |
| एकोणविसावा दिवस | 2,62,144 | रुपये |
| विसावा दिवस | 5,24,288 | रुपये |
| **एकूण** | **10,48,575** | रुपये |

10 लाख 48 हजार 5 शे. 75 रुपये द्यावे लागणार होते. त्याने हा हिशोब राजाला सांगितला. हिशोब पाहून राजा बेशुद्ध झाला.

साधूला बोलावण्यात आले. राजाने दानाची रक्कम कमी करण्याची विनंती साधूला केली.

साधू म्हणाला, ''लोक उपासमारीने मरत आहेत. मला त्यांच्यासाठी फक्त पन्नास हजार रुपये हवे आहेत. हेच मला मिळालेले दान असेल!''

राजाने खूप विनवणी केली. तो म्हणाला, ''रक्कम कमी करा.'' पण संन्यासी आपल्या शब्दावर ठाम राहिला, असहाय होऊन राजाला त्याला पन्नास हजार रुपये द्यावे लागले.

तिजोरीतून पन्नास हजार रुपये मदत मिळाल्याची बातमी देशभर पसरली. सर्वजण म्हणाले, ''आमचा राजा कर्णासारखा उदार आहे.''

सुकुमार राय

(स्रोत–रिमझिम, इ. 4 थी)

## विचार करा आणि सांगा.

**खाली दिलेल्या वाक्यांचा वापर तुम्ही केव्हा करता? खालील योग्य रकान्यात लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| पायाखालची जमीन सरकणे. | मन प्रफुल्लीत होणे. | मनाला धक्का बसणे. | लाल बुंद होणे. |
| आनंदाला उधाण येणे | रक्त सळसळणे. | ऊर भरून येणे. | हाताबाहेर जाणे. |

| जेव्हा खूप आनंद होतो. | जेव्हा खूप त्रास होतो. | जेव्हा खूप राग येतो. |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# टिपणी

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- बँकेतून पैसे काढण्याची व पैसे भरण्याची स्लीप लिहिण्याचा सराव घ्या.
- बँकेतील खात्याचा जमाखर्च लिहिण्याचा सराव घ्या.
- अर्ज लिहिण्याचा सराव घ्या.

# 13. डिजिटल साक्षरता

**आपण शिकूया!**

- डिजिटल अंकाची ओळख व लेखन
- चित्रामध्ये दिसणारे आकडे समजून घेणे.
- दैनंदिन जीवनामध्ये मोबाईल वापरताना येणाऱ्या समस्या सोडविणे.

## आता सोपी झाली वाट

वसंतराव हा जामनगर येथे राहतो. तो शेती करतो. त्याच्याकडे सुमारे 8.5 एकर जमीन आहे. त्याला तीन मुले आहेत. एक मुलगा आणि दोन मुली. तिन्ही मुले शाळेत शिकतात. वसंतरावने केवळ सहावीपर्यंतच शिक्षण घेतले आहे. त्याला वाटते त्याच्या मुलांनी खूप शिकावे. त्याने मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज घेऊन एक मोबाईल घेतला आहे.



वसंतराव आणि त्याची पत्नी मुलांचे संगोपन करण्यासाठी खूप कष्ट करतात. त्याने गेल्या खरिपात भातशेती केली आणि रब्बी मध्ये मका लावला. शेती करण्यासाठी किती रुपये लागतील याचे पूर्ण नियोजन वसंतरावने केले होते; जसे की मक्याचे बी खरेदी करणे, शेतीसाठी खत, युरिया खरेदी

करणे इत्यादी. त्याला शेताला पाणी देण्यासाठी वारंवार पंप भाड्याने घ्यावा लागत होता, त्यासाठीही पैसे लागणार होते. तो दोन मजूर पण कामावर ठेवणार होता. वसंतरावने एक बजेट बनवले होते. त्याच्या जवळ या सर्व बाबींसाठी लागतील एवढे पैसे नव्हते. वसंतराव आणि त्याच्या पत्नीने ठरवले होते, की मागील वर्षीचे जे शिल्लक पैसे होते, ते या वर्षी शेतात खर्च करू आणि जास्तीचे लागतील तर ग्रामीण बँकेकडून कर्ज घेऊ. इतके पैसे खर्च

स्त्रोत : https://play.google.com/store/apps/details?id=in.farmguide.farmerapp.central&hl=en_IN&gl=US



करताना वसंतराव घाबरला होता, कारण मुलांचे शिक्षण आणि घर खर्चासह मोबाईलचे कर्जही त्याला फेडायचे होते.

वसंतराव खूप समजदार आहे. मुलांच्या शिक्षणासाठीही तो मोबाईल वापरत असे, तसेच मोबाईलच्या साहाय्याने भारत सरकारच्या नवीन कृषी पद्धती व योजनांची माहिती करून घेत असे. त्यासाठी त्यांनी आपल्या मोबाईलमध्ये ई चौपाल, डिजिटल मंडी इंडिया, एम किसान इ. ॲप्स डाउनलोड केले होते. वसंतराव आणि त्याची मुले रोज संध्याकाळी मोबाईल बघत असत. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या मदतीमुळे ते आपली शेती कशी सुधारू शकतात हे पाहत असत.




वसंतराव एम किसान ॲपचा वापर करू लागला. येथे हवामान, बियाणे, खतांच्या किमती आणि अपेक्षित विक्री किंमत इत्यादींशी संबंधित सल्ला आणि माहिती उपलब्ध होती. यावरून त्याने हे सर्व खरेदी करण्यासाठी किती खर्च येईल याचा अंदाज घेतला. वसंतराव घरी बसून आवश्यक सर्व माहिती मोबाईलवरून घेत होता.

हवामानातील अनियमितता लक्षात घेता, वसंतरावने पीक–विमा मोबाईल ॲप्लिकेशनवर देखील नोंदणी केली, त्यामुळे त्याला त्याच्या पिकाचा कमीत कमी खर्चात विमा काढण्यास मदत झाली. कोणत्याही परिस्थितीत, पीक वाया गेल्यास, त्याला भरपाईपोटी पैसे परत मिळतील. इतर शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी आणि नवीन कल्पना जाणून घेण्यासाठी तो ई–चौपालमध्येही सामील झाला.

एके दिवशी तो सिंचनासाठी पंप भाड्याने घेणार होता. त्याला एम किसान ॲपवरून कळले, की पुढील आठवडाभर मुसळधार पाऊस पडणार आहे. ही माहिती मिळाल्याने त्याने पंप भाड्याने घेतला नाही आणि हुशारीने पैसे वाचवले.

कापणीच्या वेळी, मोबाईलवर एक सूचना आली, की येत्या काही दिवसांत जिल्ह्यामध्ये चक्रीवादळ येऊ शकते. वादळ आणि पावसाने पिकाचे नुकसान होण्यापूर्वी वसंतरावने आपले पीक काढण्यासाठी जास्त मजूर कामावर ठेवले आणि पीक काढून घेतले. वसंतरावने आपले पीक वाचवण्यासाठी आणि या हंगामात चांगले उत्पन्न मिळविण्यासाठी अतिशय हुशारीने निर्णय घेतले. हे सर्व एका मोबाइल ॲपच्या मदतीने घडले. बहुतेक वेळा तो तज्ज्ञ आणि स्थानिक अधिकाऱ्यांचा सल्ला घेत असे.

मोबाईलच्या मदतीने मुलांचा अभ्यासही चांगला झाला. यासोबतच वसंतरावने यावर्षी चांगल्या पिकातूनही चांगली कमाई केली. मोबाईलचे कर्जही फेडले आणि मुलांच्या पुढील शिक्षणासाठी काही रक्कम बँकेत जमाही केली.

## चर्चा करा.

प्रश्न 1. वसंतरावने रब्बीमध्ये कोणते पीक घेतले ?

प्रश्न 2. बियाणे आणि खतांच्या रास्त किमतीबद्दल वसंतरावला कसे कळले ?

प्रश्न 3. वसंतरावने पावसाळ्यापूर्वी सिंचन पंप भाड्याने न घेऊन चूक केली का ?

प्रश्न 4. वसंतरावला तज्ज्ञांकडून हवामान, विक्री आणि खरेदी किंमत इत्यादींची माहिती कशी मिळाली ?

प्रश्न 5. शेतकरी त्यांची शेती सुधारण्यासाठी आणि चांगली पिके घेण्यासाठी वापरू शकतील, अशा दोन ॲप्सची नावे सांगा.

## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- डिजिटल साक्षरता या विषयावर चर्चा करा. मोबाईलच्या दैनंदिन वापराबाबत सहभागींसोबत चर्चा करा. मोबाईलच्या विविध उपयोगांची चर्चा करा.

# डिजिटल अंक

तुम्ही पैसे काढण्यासाठी बँकेत जाता. बँकेत तुम्हांला एक टोकन दिले जाते. तुमचा टोकन नंबर 12 आहे, जो बारा क्रमांकाच्या खिडकीवरील मशीनवर दिसतो.

12

रेल्वे स्थानकावरील रेल्वे क्रमांक, प्लॅटफॉर्म क्रमांक शोधण्यासाठीही असे क्रमांक वापरले जातात.

| रेल्वे क्रमांक | गाडीचे नाव | प्लॅटफॉर्म क्रमांक |
|---|---|---|
| 12398 | महाबोधी एक्सप्रेस | 8 |
| 12429 | राजधानी एक्सप्रेस | 5 |

अशा प्रकारच्या संख्या मंडईमध्ये भाव बघण्यासाठी, तापमानाची नोंद बघण्यासाठी तसेच मेट्रो स्थानक इत्यादी ठिकाणी दर्शविल्या जातात.
आपल्या गणकयंत्राच्या दर्शकावर सुद्धा अशा प्रकारचे अंक असतात. तुमच्यासाठी संख्यांची रचना ओळखणे महत्त्वाचे आहे.

0 1 2 3 4 5 6 7 8 9

स्क्रीनवर संबंधित बनावटीची संख्या प्रदर्शित करा. जर तुमचा टोकन क्रमांक एकशे तेवीस असेल, तर तो स्क्रीनवर कसा प्रदर्शित होईल?


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना डिजिटल अंकांची ओळख करून द्या, त्यांना डिजिटल अंक वाचणे आणि लिहिण्याची पुरेशी संधी द्या.

**जेव्हा तुम्ही तुमच्या पिकांच्या उत्पन्नाची इतरांच्या उत्पन्नाशी तुलना करता किंवा तुमच्या गव्हाच्या उत्पन्नाची गेल्या वर्षीच्या उत्पन्नाशी तुलना करता, तेव्हा अशी तुलना करण्यासाठी चित्रे खूप उपयुक्त असतात. गीता – ''अरे वा! माझ्याकडे गव्हाचे एक पोते जास्त आहे.''**
**पाहूनच गीताला कसे समजले असेल?**





गीताला जाणून घ्यायचे होते, की कोणत्या पक्षाचे सरकार स्थापन होणार आहे. गीता टी. व्ही. वर निवडणुकीच्या निकालाशी संबंधित बातम्या पाहत आहे. ज्या दिवशी निवडणुकीचे निकाल येतील, त्या दिवशी टी. व्ही. वर अशा प्रकारचे चित्र तयार केले जाते; ज्यावरून कोणत्या पक्षाला जास्त जागा मिळाल्या हे समजणे सोपे जाते.




चित्र पाहून सांगा.

- कोणत्या पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या?
- कोणत्या पक्षाला सर्वांत कमी जागा मिळाल्या?


त्याचप्रमाणे आपण आपल्या आजूबाजूला बघून इतर माहिती गोळा करीत असतो. गीतानेही आपल्या शेतात फळझाडे लावली आहेत.




**चित्र पाहून सांगा, की**

- पेरूची झाडे शेताच्या .......................... भागात लावली आहेत.
- आंब्याची झाडे शेताच्या .......................... भागात लावली आहेत.
- लिंबाची झाडे शेताच्या .......................... भागात लावली आहेत.

गीता टीव्हीवर एक ट्वेन्टी–ट्वेन्टी क्रिकेट सामना पाहत आहे. शेवटच्या सहा षटकात किती धावा केल्या आहेत हे आकृतीत दाखवले आहे.




**चित्र पाहून सांगा, की**

**प्रश्न 1. कोणत्या षटकात सर्वाधिक धावा झाल्या आहेत? तुम्हांला असे का वाटते?**

**प्रश्न 2. कोणत्या षटकात सर्वांत कमी धावा झाल्या आहेत?**

**प्रश्न 3. कोणत्या षटकात 10 धावा झाल्या आहेत?**

**प्रश्न 4. 15 व्या षटकात किती धावा झाल्या आहेत?**

सामना पाहिल्यानंतर गीता मोबाईल रिचार्ज करण्यासाठी दुकानात गेली. तिला खाली दिलेल्या प्लॅनपैकी एक प्लॅन रिचार्जसाठी निवडायचा होता.

| | | | |
|---|---|---|---|
| रिचार्ज | ₹155 | ₹179 | ₹479 |
| वैधता | 28 दिवस | 28 दिवस | 28 दिवस |

क. कोणता रिचार्ज गीतासाठी फायद्याचा असेल?

ब. जर गीताने ₹179 चा रिचार्ज केला आणि तिने दुकानदाराला 500 रुपयांची नोट दिली, तर तो दुकानदार गीताला किती रुपये परत करेल?

क. गीताने रिचार्ज 18 मार्चला केला आणि तिच्या रिचार्जची वैधता 28 दिवस होती, तर तिला पुढचा रिचार्ज कधी करावा लागेल?

**मार्च**

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

**एप्रिल**

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| 30 | | | | | | |

# मोबाईलचे जग

सीताने बाबांचे बँक खाते मोबाईल क्रमांकाशी जोडले होते. तिने बाबांना मोबाईलवरून वीज शुल्क भरायला आणि फोन रिचार्ज करायला शिकवले होते. बाबा फोनवरून सर्व प्रकारचे शुल्क जमा करायचे. पैसे त्यांच्या खात्यातून कापले जात होते, त्यामुळे बाबांचा कार्यालय आणि दुकानात जाण्याचा त्रास संपला होता. सुट्टी संपल्यावर सीता शहरात गेली. ती तिथे शिकत होती. कधी ती तिचे महाविद्यालयाचे छायाचित्र मोबाईलवर पाठवायची, तर कधी चित्रफीत पाठवायची.

बाबा तिने पाठविलेली छायाचित्रे मोबाईलमध्ये उत्सुकतेने पाहात. व्हॉट्सअॅपवर संदेश लिहून सल्ला सांगत. पत्राऐवजी आता बाबा तिला ई-मेल करत होते. यामुळे पत्र पाठवायचा खर्च आणि वेळ दोन्हींची बचत होत होती.




एके दिवशी सीताने बाबांशी व्हिडीओ कॉल करून संपर्क साधला. बाबांनी तिला सांगितले, आता मी यू-ट्यूबवर लोकगीत ऐकूनच झोपतो. तुला एक गोष्ट सांगू, सर्व बातम्यांच्या वाहिन्या पण यू-ट्यूबवर पाहायला मिळतात.

सीता म्हणाली, ''वा बाबा! तुम्ही तंत्रस्नेही झालात! चांगली गोष्ट आहे. बरं बाबा, मला एक गोष्ट सांगा; तुम्हांला तुमचा ए. टी. एम. कार्ड नंबर कोणी विचारला आहे का?''

बाबा म्हणाले, ''अरे हो, एक दिवस विचारले होते, पण मी सांगितला नाही. मग त्याने एटीएमचा पिनही मागितला असता आणि माझ्या खात्यातून सगळे पैसे निघून गेले असते. माझी फसवणूक झाली असती.''

सीता म्हणाली, ''चांगलं केलंत बाबा! आता तुम्ही सायबर चोरांपासून स्वतःला वाचवायला शिकलात. ''शहरात फिरण्यासाठी भाड्याने गाडी किंवा मोटारसायकल मोबाईलवरून आरक्षित करत जा. एखादे महत्त्वाचे पुस्तक मागवायचे असेल, तर आजकाल ते मोबाईलवरून पण मागवता येते. त्यासाठी अनेक ॲप्स उपलब्ध आहेत. गुगलवर व प्ले स्टोअरवर शोधल्यास सर्व काही मिळेल. ई–वाचनालय या वरही पुस्तके शोधून वाचता येतात. ही सर्व माहिती ऐकताना बाबांना खूप आनंद झाला.

बाबा तर मोबाईलबद्दल खूप जाणकार झाले आहेत, सीता विचार करत हसली. त्यानंतर सीताने तिचे कॉलेज बाबांना चित्रफितीवर दाखविले. बाबांनीही सीताला गव्हाचे शेत दाखवले आणि ज्यात आता पाणी खूपच कमी झाले होते, ते तळेही दाखविले. तिथे करकोचा, पानकोंबड्या आणि सारस पाणथळ जमिनीवर फिरत होते.

बाबांना आपल्या मुलीसोबत शहरात आल्यासारखे वाटले. सीताला क्षणभर गावातील तलावाच्या शेतात पोहोचल्यासारखे वाटले.

– प्रभात

## ▪ संवादासाठी

प्रश्न 1. सीताने बाबांना मोबाईलवर काय शिकवले ?

प्रश्न 2. बाबांनी सीताला मोबाईल वापरण्याबाबत कोणकोणते धडे दिले ?

प्रश्न 3. मोबाईलने बाबा आणि सीता यांच्यातील अंतर कसे कमी केले ?

तुम्ही पण मोबाईलचा वापर करून तुमच्यापासून दूर असणाऱ्या ओळखीच्या व्यक्तीशी बोलून, अंतर कमी केल्याचा अनुभव घेतला आहे का? जर होय, तर सर्वांशी शेअर करा.

प्रश्न 4. मोबाईलवर सायबर फसवणुकीच्या घटना ऐकायला मिळतात. हे टाळण्यासाठी आपण कोणती खबरदारी घेतली पाहिजे ?

## ▪ वाचा, बोला आणि लिहा.

प्रश्न 1. मोबाईलचे कोणकोणते फायदे आहेत ?

______________________________

______________________________

______________________________

प्रश्न 2. मोबाईल वापरताना तुम्ही कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष देता ?

______________________________

______________________________

______________________________

प्रश्न 3. खाली दिलेल्या प्रश्नांच्या योग्य उत्तरासमोर (✓) चिन्ह द्या. खालीलपैकी कोणते व्यवहार मोबाईलद्वारे केले जाऊ शकतात?

पैशांचे ☐

संदेशांचे ☐

चित्रांचे ☐

या तिन्हींचे ☐

- तुम्ही तुमचा मोबाईल कोणकोणत्या कामासाठी वापरता? यादी बनवा.


- मोबाईलमुळे तुम्हांला कोणत्याही कामात मदत झाली असेल, तर त्या अनुभवाविषयी सांगा.

## मोबाईलचे इतर काही उपयोग

- एस. एम. एस. द्वारे संदेश पाठवू शकता.
- आपण कॅल्क्युलेटरच्या मदतीने गणितीय क्रिया करू शकता.
- घड्याळाचा गजर लावू शकता.
- तुम्ही दिनदर्शिका पाहू शकता.
- तुम्ही किती चाललात हे तपासू शकता; म्हणजेच तुम्ही किती वेगाने चालत आहात, हे देखील कळू शकते.
- मोबाईलद्वारे अभ्यास केला जातो. यात काही खास ॲप्लिकेशन्स आहेत; ज्याद्वारे तुम्ही थेट वर्गात सामील होऊ शकता, जसे – झूम मीटिंग, गुगल मीट, मायक्रोसॉफ्ट टीम्स इ. या ॲप्लिकेशन्समध्ये तुम्हांला आधी स्वतःची नोंदणी करावी लागते.
- जी. पी. एस. (स्थान) द्वारे योग्य दिशा आणि मार्ग माहीत होतात.
- विविध प्रकारचे खेळ खेळता येतात.
- फेसबुक चालविता येते.
- रेडिओ ऐकू शकता.
- आवाज रेकॉर्ड करू शकता. (गाणी गाऊन किंवा कथा बोलून चित्रफीत बनवू शकता.)
- तुम्ही हवामान तपासू शकता.
- जवळपासची हॉटेल्स, रुग्णालये, शाळा, रेल्वे स्टेशन, उद्याने इत्यादी शोधू शकता.

## पाहा, वाचा आणि चर्चा करा.

तुम्ही तुमच्या मोबाईल मध्ये यांमधील कशा–कशाचा वापर करता? बरोबर (✓) चे चिन्ह द्या.



घड्याळ





दिनदर्शिका

व्हॉट्सअ‍ॅप





संदेश



गणकयंत्र

गुगल मॅप

यू–ट्यूब




ई–मेल

फेसबुक



संपर्क सूची

DIKSHA
दीक्षा अ‍ॅप




टॉर्च

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- दिलेल्या चित्रांची क्रमाक्रमाने सहभागींना ओळख करून द्या. चित्राखाली लिहिलेले शब्द वाचून घ्या. यांच्या वापरासंदर्भात चर्चा करा. काही सहभागी कदाचित यांच्या वापराबाबत अनभिज्ञ असतील, त्यांना पुरेशी माहिती करून द्या.

## ■ माहितीसाठी



सायबर सुरक्षा सूचनांवर
एक पॉकेट बुक
CC-by-NC-SA




Helpline Number :
1930
FREE
■ मोफत उपलब्ध होणाऱ्या सॉफ्टवेअरबाबत काळजी घ्या.
Complaint:
https://cybercrime.gov.in
Guidelines for School System:
https://ciet.nic.in/pages.php?id=book-let-on-cyber-safetysecurity&ln=en&ln=en




Helpline Number :
1930
PASSWORD
■ आपला पिन/ओटीपी/खातेसंबंधी माहिती कधीही कोणत्याही अनोळखी व्यक्तीला सांगू नका.
Complaint:
https://cybercrime.gov.in
Guidelines for School System:
https://ciet.nic.in/pages.php?id=book-let-on-cyber-safetysecurity&ln=en&ln=en




Helpline Number :
1930
Password
***
■ पासवर्ड लक्षात ठेवण्यासाठी तुमचा मेंदू ही सर्वोत्तम जागा आहे.
Complaint:
https://cybercrime.gov.in
Guidelines for School System:
https://ciet.nic.in/pages.php?id=book-let-on-cyber-safetysecurity&ln=en&ln=en

Helpline Number : 1930




- स्पॅम संदेशामध्ये उपलब्ध असलेल्या लिंक उघडू नका.

**Complaint:** https://cybercrime.gov.in **Guidelines for School System:** https://ciet.nic.in/pages.php?id=booklet-on-cyber-safetysecurity&ln=en&ln=en

Helpline Number : 1930




- तुम्ही ऑनलाईन वाचलेल्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवू नका.

**Complaint:** https://cybercrime.gov.in **Guidelines for School System:** https://ciet.nic.in/pages.php?id=booklet-on-cyber-safetysecurity&ln=en&ln=en

Helpline Number : 1930



- वैयक्तिक फोटो ऑनलाईन शेअर करण्यापूर्वी दोनदा विचार करा.

**Complaint:** https://cybercrime.gov.in **Guidelines for School System:** https://ciet.nic.in/pages.php?id=booklet-on-cyber-safetysecurity&ln=en&ln=en

Helpline Number : 1930




- जर तुम्ही सायबर गुन्ह्याचे बळी ठरत असाल, तर लगेच तक्रार करा.

**Complaint:** https://cybercrime.gov.in **Guidelines for School System:** https://ciet.nic.in/pages.php?id=booklet-on-cyber-safetysecurity&ln=en&ln=en













**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- दिलेल्या चित्रांच्या मदतीने सहभागींना सायबर सुरक्षेबद्दल जागरूक करा. सहभागींसोबत 'नेटिकेट' (इंटरनेट शिष्टाचार) वर्तनावर चर्चा करा. या विषयावरील अधिक माहितीसाठी तुम्ही सोबत दिलेल्या लिंकचाही वापर करू शकता.

# टिपण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शेतीतून मिळणाऱ्या विविध उत्पादनांची नावे लिहिण्यास सांगा.
- M-Kisan व ई चौपाल या ॲपच्या वापराबाबत मोबाईलवर सराव घ्या.

# वर्णमाला

अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ

ए ॲ ऐ ओ ऑ औ अं अः

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व श

ष स ह ळ

क्ष ज्ञ

## श्रेय नामावली

- **लेखन व निर्मिती सहभाग :**

**डॉ. सुचिता राऊत,** अध्यापकाचार्य,
महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
**श्रीम. माधुरी देशमुख,** अध्यापकाचार्य,
महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
**श्री. शीतल वडनेरकर,** शिक्षिका,
जि. प. प्राथ. शाळा क्र. २, वेरूळ (कन्या) ता. आर्वी, जि. वर्धा.
**श्रीम. शुभांगिनी वासनिक,** शिक्षिका,
जि. प. शाळा, सुलतानपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.
**श्रीम. दीपा गिरी,** शिक्षिका,
जि. प. प्राथ. केंद्र शाळा, तळेगाव (टा.), ता. वर्धा, जि. वर्धा.
**श्रीम. नेहा साळुंखे,** सहा. शिक्षक,
शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.
**श्री. सूरज सावळे,** सहा. शिक्षक,
शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.

